आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

२६ मार्च २०२६ - गुरूवार

**ठळक बातम्या**

- भारताकडे कच्चं तेल आणि पेट्रेलियम पदार्थांचा सुमारे ६० दिवसांचा साठा, पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीचा तुटवडा नसल्याचं केंद्र सरकारकडून स्पष्ट

- पारलिंगी हक्क संरक्षण दुरुस्ती विधेयक मागे घेण्याची सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीची केंद्र सरकारला सूचना

- देशभरात रामनवमी उत्साहात साजरी

- आंध्र प्रदेशात झालेल्या रस्ते अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू, तर २८ जण जखमी

- ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**आणि**

- मालदीवजमध्ये सुरू असलेल्या वीस वर्षांखालच्या सॅफ फुटबॉल स्पर्धेत पाकिस्तानवर ३- ० नं मात करत भारताची उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

भारताकडे ७४ दिवसांची साठवण क्षमता असून कच्चं तेल आणि पेट्रेलियम पदार्थांचा साठा सुमारे ६० दिवसांचा असल्याची माहिती केंद्र सरकारने दिली आहे. देशातलं पेट्रोलियम आणि एलपीजी वितरण सुरळीत तसंच पूर्णपणे नियंत्रणात असल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने सांगितलं. सर्व इंधन विक्री केंद्रांवर पुरेसा साठा असून पेट्रोल, डिझेल किंवा एलपीजीचा देशभरात कुठेही तुटवडा नाही असं मंत्रालयाने स्पष्ट केलं आहे. जगभरातल्या ४१ पुरवठादार देशांमधून भारताला कच्च्या तेलाची आवक वाढली आहे, देशातला प्रत्येक तेलशुद्धीकरण प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू आहे, असं मंत्रालयानं कळवलं आहे. तेलशुद्धीकरण प्रकल्पातलं उत्पादन ४० टक्क्यांनी वाढवलं असून दैनंदिन एलपीजी उत्पादन ५० हजार मेट्रिक टन झालं आहे. त्यामुळे चुकीच्या माहितीवर विश्वास ठेवू नका असं आवाहन पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने केलं आहे.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२६ मार्च २०२६ - गुरूवार

<><><><>

पश्चिम आशियामधलं युद्ध राजनैतिक मार्गांनी थांबवण्याची शक्यता धूसर झाल्यानं आता इराण आणि अमेरिकेनं आक्रमक पावित्रा घेतला आहे. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवर आपलं नियंत्रण अधिक घट्ट केलं असून अमेरिका इराणमधे लष्कर घुसवण्याची तयारी करत आहे. अमेरिकेचं यू एस एस त्रिपोली हे जहाज अडीच हजार नौदल सैनिकांना घेऊन पश्चिम आशियाकडे निघालं आहे. तसंच एक हजार निमलष्करी जवानांना या प्रदेशात तैनात करण्याचा निर्णय अमेरिकेेनं घेतला आहे. मात्र इराणला होर्मुझची सामुद्रधुनी खुली करायला भाग पाडण्यासाठी अमेरिका लष्करी बळाचा वापर करेल की नाही हे अद्याप स्पष्ट नाही.

<><><><>

पश्चिम आशियातली युद्धपरिस्थिती अधिक चिघळण्याच्या भीतीमुळे आज ब्रेंट कच्च्या तेलाचे दर वाढून १०६ डॉलर्स प्रति बॅरल पर्यंत गेले, तर वेस्ट टेक्सास इंटरमिजिएट कच्चे तेल वधारून ९३ डॉलर्स प्रति बॅरल पर्यंत गेलं आहे.

<><><><>

पारलिंगी हक्क संरक्षण दुरुस्ती विधेयक, २०२६ मागे घेण्याची सूचना, सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या समितीनं केंद्र सरकारला केली आहे. हे विधेयक नुकतंच संसदेत मंजूर झालं होतंं. दिल्ली उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती आशा मेनन यांच्या अध्यक्षतेखालच्या या समितीनं सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाला पत्र लिहून, या दुरुस्तीतल्या काही तरतुदींविषयी गंभीर चिंता व्यक्त करत, कायद्याचा पुनर्विचार करायला सांगितलं आहे. या दुरुस्तीमुळे स्व-ओळख हक्क आणि गोपनीयतेवर मर्यादा येत असल्याचं निरीक्षण समितीनं नोंदवलं. नवीन कायद्यात अपहरण आणि शोषण यांसारख्या गुन्ह्यांसाठी कठोर शिक्षा प्रस्तावित आहेत, परंतु हे गुन्हे आधीच इतर कायद्यांतर्गत समाविष्ट असल्याचं समितीनं नमूद केलं आहे.

स्व-ओळख काढून टाकणं हे २०१४ च्या राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणासंदर्भातल्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाशी विसंगत आहे. त्यामुळे भविष्यातली दुरुस्ती पारलिंगींशी चर्चा करूनच करावी, असंही समितीनं म्हटलं आहे.

<><><><>

राज्यासह देशभरात आज चैत्र शुद्ध नवमी अर्थात रामनवमीनिमित्त रामजन्मोत्सव साजरा करण्यात आला.

**नागपूर** मध्ये रामनवमी निमित्त पोद्दारेश्वर राम मंदिर येथून सुंदर चित्ररथांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह उपस्थित मान्यवरांनी प्रभू श्रीरामांना पुष्पहार अर्पण केले. मिरवणुकीत आकर्षक देखावे सादर करण्यात आले होते तसंच महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलं होतं.

**<><><><><>**

आंध्र प्रदेशात मार्कापुरम जिल्ह्यात रायवरमजवळ आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात १३ प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला, तर २८ जखमी झाले. खासगी प्रवासी बसची टिपर ट्रकशी टक्कर झाली आणि बसला आग लागली. तेलंगणातल्या जगतियालहून ही बस नेल्लोर जिल्ह्याकडे जात असताना हा अपघात झाला.

या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबांना प्रधानमंत्री राष्ट्रीय मदत निधीतून प्रत्येकी २ लाख रुपये, तर जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत दिली जाणार आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनी मृतांच्या कुटुंबीयांप्रति शोकभावना व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांचं आज कोल्हापूर इथं निधन झालं, ते ८५ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर आज कोल्हापुरात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात लोककल्याणकारी राज्य निर्माण करुन त्या राज्याची घडी आधुनिक जीवन मूल्यांनुसार बसवली हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलू पवार यांनी प्रकाशात आणला. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतरही मराठ्यांचा लढा सुरू ठेवणाऱ्या तसंच करवीर संस्थानच्या संस्थापिका महाराणी ताराराणींचं चरित्र पवार यांनी लिहिलं आहे.

अखिल महाराष्ट्र इतिहास परिषदेचे ते संस्थापक - सदस्य आणि काही काळ अध्यक्ष होते. त्यांनी महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी या संस्थेची स्थापना केली होती.

पवार यांच्या निधनानं तत्वनिष्ठ, व्यासंगी आणि शांतपणे काम करणारा संशोधक हरपला आहे अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आदरांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांनीही त्यांना आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><>**

मालदीवजमध्ये माले इथं सुरू असलेल्या सॅफ अर्थात दक्षिण आशिया फुटबॉल महासंघातर्फे आयोजित वीस वर्षांखालच्या फुटबॉल स्पर्धेत आज भारतानं पाकिस्तानवर ३ - ० अशा गोल फरकानं दणदणीत विजय मिळवत उपांत्य फेरीत धडक मारली. या पराभवामुळे पाकिस्तानचं स्पर्धेतलं आव्हान संपुष्टात आलं आहे.

पहिल्या हाफमध्ये विशाल यादवनं भारतासाठी पहिला गोल केला. १-० अशी आघाडी घेतलेल्या भारतानं दुसऱ्या हाफमध्येही मिळालेल्या संधींचा योग्य फायदा घेतला. बदली खेळाडू म्हणून आलेल्या ऋषीनं डोडुमला पास दिला आणि त्यानं आणखी एक  गोल करत भारताची आघाडी २-० अशी केली. पाकिस्ताननं सतत हल्ले चढवले, पण भारताची बचावफळी भेदणं त्यांना शक्य झालं नाही. डोडुमने पेनल्टीवरून पुन्हा गोल करत भारताच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं.

**<><><><><>**

बीसीसीआय, अर्थात भारतीय क्रिकेट नियामक मंडळानं आज इंडियन प्रीमियर लीग २०२६ च्या दुसऱ्या टप्प्याचं वेळापत्रक जाहीर केलं. या टप्प्यात बंगळूर, मुंबई, चेन्नई, कोलकाता आणि दिल्लीसह १२ शहरांमध्ये १३ एप्रिल ते २४ मे दरम्यान ५० सामने खेळवले जातील. सलामीचा सामना हैदराबादमध्ये सनरायझर्स हैदराबादचा आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात होईल. या टप्प्यात आठ डबल-हेडर सामने खेळवले जातील. पहिल्या टप्प्यातील सामने येत्या २८ तारखेपासून सुरू होतील.

**<><><><><>**

भारतानं  संयुक्त राष्ट्रांची अधिक कडक हवामान उद्दिष्टं मान्य केल्याबद्दल संयुक्त राष्ट्रांचे हवामान प्रमुख सायमन स्टील यांनी भारताची प्रशंसा केली आहे. ही उद्दिष्टं  २०३१ ते ३५  या काळासाठी असून कार्बन उत्सर्जनात घट, स्वच्छ उर्जेत वाढ आणि वनक्षेत्रावरचं

अवलंबित्व कमी करणं याबाबतीत राष्ट्रीय स्तरावर निर्धारित योगदान द्यायला भारताने मंजूरी दिल्यानंतर ते बोलत होते. स्वच्छ उर्जा आणि आर्थिक प्रगती हातात हात घालून चालू शकतात हे यातून दिसून येतं असंही स्टील यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

लंडनच्या QS टॉप 50 सब्जेक्ट रँकिंग या जागतिक क्रमवारीत भारतीय शैक्षणिक संस्थांना चांगलं मानांकन मिळाल्याबद्दल केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आनंद व्यक्त केला आहे. राष्ट्रीय शिक्षण नीती अंतर्गत गुणवत्ता, नवोपक्रम आणि जागतिक सहभागावर भर दिला जात असून त्यामुळे देशातल्या शैक्षणिक संस्थांचा दर्जा सुधारल्याचं या मानांकनातून दिसून येत असं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

या जागतिक मानांकनात दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाची कामगिरी सातत्यानं चांगली होत असल्याबद्दल विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. शांतीश्री पंडित यांनी विद्यार्थी आणि प्राध्यापकांच अभिनंदन केलं आहे.

**<><><><><>**

आखाती देशांमधल्या युद्धामुळे निर्माण झालेली परिस्थिती लक्षात घेत महाराष्ट्र सरकारनं पर्यायी इंधन म्हणून केरोसीन वितरणाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला आहे. **केंद्र सरकारने महाराष्ट्रासाठी ३७ लाख ४४ हजार लिटर केरोसीनच्या वाटपाला मंजुरी दिली आहे. त्यानुसार राज्यात मार्च आणि एप्रिल महिन्यांमध्ये** तिन्ही सरकारी तेलकंपन्यांकडून प्रत्येक शिधापत्रिकेमागे ३ लिटर केरोसीनचं वाटप केलं जाणार आहे. ज्या कुटुंबाकडे शिधापत्रिका नाही, अशी कुटुंब देखील केरोसीनच्या उपलब्धतेनुसार केरोसीन वितरणास पात्र राहतील.

एकूण वाटपाच्या ८५ टक्के केरोसीन पहिल्या पंधरवड्यात वितरित करण्याचे आदेश राज्य सरकारने जारी केले आहेत.

**//<><><><><>//**